# Office of District Deputy Commisioner A H Amravati
Tapovan Road Amravati

Email-dccahamravati@gmail.com

TENDER FORM

FOR

**अमरावती जिल्हा अंतर्गत व जिल्ह्याबाहेरुन आवश्यकता भासल्यास पर प्रांतातुन लागणारे द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतुक**

**Transportation of liquid nitrogen and semen doses required within Amravati district and, if necessary, from outside the district or other states."**

## For year 2025-26

Submitted by: ______________________

______________________

______________________

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त अमरावती
सत्यमेव जयते

## १. दर करारासाठी निविदा प्रक्रियेखालील वस्तू/सेवा (ITEMS UNDER TENDER PROCESS FOR RATE CONTRACT)

जिल्हा पशुंसवर्धन उपायुक्त अमरावती यांचेमार्फत वाहतुक दर करार अंतिम करण्यासाठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.अमरावती जिल्हा अंतर्गत व जिल्ह्याबाहेरुन आवश्यकता भासल्यास पर प्रांतातुन लागणारे द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतुकीकरिता दिनांक **०१ नोव्हेंबर २०२५ ते ३१ ऑक्टोंबर २०२६** या **एक वर्षाच्या** कालावधीमध्ये २.२ मे. टन क्षमता (मिनी ट्रक)वाहनाचे वाहतुक कंत्राटदारा कडुन ई-निवीदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.अमरावती जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्थाना जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र कार्यालय, तपोवन रोड, कॅम्प अमरावती येथुन नियोजीत कार्यक्रमानुसार दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ ते ३१ ऑक्टोंबर २०२६ या **एक वर्षाच्या** कालावधीमध्ये द्रवनत्र भरलेली पात्रे, विर्यमात्रा पात्रे पोहचविणे व परत आणणे ही कामे कंत्राटदाराने अंदाजे **२.२** मे. टन वाहतुक करण्याची वाहन क्षमता मिनी ट्रक या वाहनाने करावयाची आहे.

## २. निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याची पात्रता (ELIGIBILITY FOR PARTICIPATION IN TENDER PROCESS):

a) निविदादार कोणत्याही सरकारी संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था/सार्वजनिक क्षेत्रातील संस्थेद्वारे **काळ्या यादीत समाविष्ट नसावा** व गुणवत्तेविषयी कोणतीही कायदेशीर/दंडात्मक कारवाई प्रलंबित नसावी. आवश्यकतेनुसार सादर केलेल्या संस्थांकडून **चांगल्या कार्यप्रदर्शनाचे प्रमाणपत्र (Good Performance Certificate)** मागविले जाऊ शकते.
b) वरील अटींचे पालन न केल्यास निविदा **अयोग्य ठरेल** व अशा प्रकरणात व्यावसायिक निविदा (Commercial Bid) उघडली जाणार नाही.

## ३. निविदा फॉर्म प्राप्त करण्याची प्रक्रिया (HOW TO GET A TENDER FORM):

निविदा फॉर्म व अटी व शर्ती **https://mahatenders.gov.in** या महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा संकेतस्थळावरून डाउनलोड करून ऑनलाईन सादर करता येईल.यासाठी **रु. ४२००/- (परत न होणारे शुल्क)** भरावे लागेल.

## ४. तारण रक्कम (EARNEST MONEY DEPOSIT - EMD):

निविदादाराने **रु. ५५,०००/-** इतकी तारण रक्कम (EMD) अधिकृत ई-निविदा पेमेंट गेटवेद्वारे, **"District Deputy Commissioner A H Amravati"** यांच्या नावे भरावी.
ही रक्कम ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल. **धनादेश किंवा रोकड स्वीकारली जाणार नाही.**

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त अमरावती
सत्यमेव जयते

**EMD भरण्यापासून सूट** मिळेल, मात्र त्या संदर्भातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. निविदादाराने दर मंजूर झाल्यानंतर पुरवठ्याचा करार करण्यास नकार दिल्यास, त्याची **EMD रक्कम जप्त केली जाईल.**

## ५. निविदेचा कालावधी (TENDER TIME SCHEDULE KEY DATES):

| .अ. क्र | तपशील | पासुन | | पर्यंत | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| 1 | ई-निवीदा संकेत स्थळावर उपलब्ध असण्याचा कालावधी | 27/10/2025 | 12.00 | 03/11/2025 | 12.00 |
| 2 | ऑनलाईन टेंन्डर डॉक्युमेंन्ट डाउनलोड करण्याचा कालावधी | 27/10/2025 | 12.00 | 03/11/2025 | 12.00 |
| 3 | ऑनलाईन निविदा दाखल करण्याचा कालावधी | 27/10/2025 | 12.00 | 03/11/2025 | 12.00 |
| 4 | ऑनलाईन निविदा लिफाफा क्र.1 (तांत्रिक) उघडण्याचा कालावधी | - | - | 03/11/2025 | 15.00 |
| 5 | ऑनलाईन निविदा लिफाफा क्र.1 (वाणीज्य) उघडण्याचा कालावधी | - | - | 03/11/2025 | 17.00 |

**टीप:** ई-निविदा प्रणाली निर्धारित वेळेनंतर कोणत्याही निविदादाराला सहभागी होऊ देणार नाही. वेळवाढीची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

## ६. ऑनलाईन निविदा सादरीकरणाची पद्धत (MANNER OF SUBMISSION OF ONLINE TENDER FORMS):

निविदादाराने **https://mahatenders.gov.in** या ई-निविदा संकेतस्थळावर **दोन लिफाफा प्रणाली (Two Bid System)** नुसार निविदा सादर करावी.

- दर फक्त **व्यावसायिक लिफाफ्यात (Commercial Bid – BOQ)** नमूद करावेत आणि निविदादाराच्या **डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्राने (DSC)** एन्क्रिप्ट केलेले असावेत.
- आवश्यक कागदपत्रे **तांत्रिक लिफाफ्यात (Technical Bid)** अपलोड करावीत.
- निविदा उघडताना प्रथम **तांत्रिक लिफाफा** उघडला जाईल.
- केवळ सर्व अटी व शर्ती पूर्ण केलेल्या निविदादारांच्या **व्यावसायिक लिफाफ्याच** उघडल्या जातील.
- अटींचे पालन न केलेल्या निविदा **सरळ नाकारल्या जातील** आणि त्यावर कोणताही दावा ग्राह्य धरला जाणार नाही

**अ) तांत्रिक लिफाफा (तांत्रिक बोली):**

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त अमरावती
सत्यमेव जयते

तपासणी यादी (परिशिष्ट-D) मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील कागदपत्रे अनिवार्य / पर्यायी स्वरूपात तांत्रिक माहितीसाठी आवश्यक आहेत.
मूळ कागदपत्रांची स्कॅन केलेली प्रत तांत्रिक लिफाफ्यात अपलोड करावी.
मूळ कागदपत्रे व त्यांची स्वयंप्रमाणित प्रत बोली उघडण्याच्या वेळी पडताळणीसाठी तयार ठेवावीत.

**अनिवार्य कागदपत्रे:**

a) आर्थिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या वर्षांच्या आयकर विवरणपत्रांची पावती.
b) निविदादाराचा PAN नोंदणी प्रमाणपत्र.
c) निविदादाराचा GST नोंदणी प्रमाणपत्र नमुना **FORM REG-०६.**
d) निविदादाराने स्वाक्षरी केलेला घोषणा पत्र **(परिशिष्ट-E).**
e) निविदादाराने स्वाक्षरी केलेली तपासणी यादी **(परिशिष्ट-D).**
f) EMD सूट मिळण्यासाठी संबंधित प्राधिकरणाकडून जारी केलेली कागदपत्रे / सूट प्रमाणपत्र.
g) मागील शासकीय / अर्धशासकीय / सहकारी संस्थांमध्ये अशा प्रकारच्या कामाच्या अनुभवाचा तपशील.

**वाहना संबधी कागदपत्रे**

a. वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र (Maharashtra State )
b. रोड टॅक्स प्रमाणपत्र (Maharashtra State )
c. वाहनाचा विमा अद्यावत असलेबाबत (Insurance Cover)
d. फिटनेस प्रमाणपत्र (Form ३८ )
e. वाहतुक परवाना(Permit Transport Department Maharashtra)
f. राज्याबाहेरील वाहतुक परवाना
g निवीदा अर्जाचे शुल्क व अनामत रक्कम ऑनलाईन भरल्याबाबत पावती.
h.इतर आवश्यक कागदपत्रे जसे पी.यु.सी.

**ब)व्यावसायिक निविदा (Commercial Bid):**

- वाहतुकीचा दर फक्त ऑनलाईन व्यावसायिक निविदा **(BOQ)** मध्येच नमूद करावा.
- निर्धारित ऑनलाईन निविदा फॉर्मव्यतिरिक्त (उदा. वेगळ्या कागदावर किंवा दस्तऐवजात) दिलेले दर विचारात घेतले जाणार नाहीत आणि अशा निविदा नाकारण्यात येतील.
- जिल्हा पशुसंवर्धन् उपायुक्त अमरावती यांना आवश्यक वाटल्यास दिलेल्या दरांचा तपशीलवार विभागवार (breakup) मागविण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येतो.
- व्यावसायिक (Commercial) आणि तांत्रिक (Technical) लिफाफे निर्धारित प्रक्रियेप्रमाणे ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.
- निर्धारित तारीख व वेळेनंतर प्राप्त झालेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत तसेच वेळवाढीच्या कोणत्याही मागणीवर विचार केला जाणार नाही.

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त
सत्यमेव जयते
अमरावती

- नोंदणीकृत टपाल, स्पीड पोस्ट किंवा कुरिअरद्वारे पाठविलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
- कोणत्याही निविदादाराने **बाह्य दबाव आणण्याचा किंवा विभागीय अधिकार्यांमार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न** केल्यास त्यांची निविदा **थेट नाकारली जाईल.**

### ७.तपासणी यादी (Check List):

तपासणी यादीतील (परिशिष्ट-D) नमूद कागदपत्रे ई-निविदा फॉर्मसोबत **ऑनलाईन अपलोड करणे अनिवार्य** आहे.या संदर्भात कोणतीही त्रुटी अथवा कागदपत्रांचा अभाव आढळल्यास, संबंधित निविदा **नामंजूर केली जाऊ शकते. विभाग अ ब व क** निविदाकाराने स्वाक्षरी करुन अपलोड करणे बंधनकारक आहे.

ऑनलाईन निविदा तयार करण्यापूर्वी, निविदादाराने तपासणी यादीतील प्रत्येक बाब काळजीपूर्वक तपासावी आणि संबंधित ठिकाणी **"होय" किंवा "नाही"** असे नमूद करावे तसेच संबंधित **पृष्ठ क्रमांक** नमूद करावा.

### ८. सुरक्षा ठेव (Security Deposit):

निवड झालेल्या निविदादाराने संबंधित वस्तूच्या एकूण अंदाजित किंमतीच्या ३% इतकी सुरक्षा ठेव सादर करावी लागेल, जी कराराच्या वेळी निश्चित केली जाईल. सुरक्षा ठेव जिल्हा पशुंसवर्धन उपायुक्त अमरावती यांच्या नावे राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित व्यावसायिक बँकेतून बँक हमीच्या स्वरूपात द्यावी.

a. सुरक्षा ठेव करार कालावधी पूर्ण झाल्यानंतर ३ महिन्यांनी परत करण्यात येईल.
b. निविदेतील व/किंवा करारातील अटींचे उल्लंघन झाल्यास सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल.

### ९. मागणी करणाऱ्या संस्था (Indenting Parties):

द्रवनत्र वाहतुक बाबत जिल्हा पशुंसवर्धन उपायुक्त अमरावती हे मागणी अधिकारी असतील.

### १०. बिल सादरीकरण, पेमेंट व त्याची प्रक्रिया (Bill Raising, Payment and Procedure):

a. मागणी अधिकाऱ्याने मागविलेल्या द्रवनत्र वाहतुक झाल्यानंतरच पेमेंट करण्यात येईल.
b. करारदार संस्थेच्या नावाने सादर केलेल्या बिलावरच पेमेंट करण्यात येईल.
c. शासनाच्या कोषागारातून देयके दिली जाणार असल्याने, निधी प्राप्त होण्यात किंवा कोषागार प्रक्रियेतील विलंबाबाबत अधिकाऱ्याची जबाबदारी राहणार नाही.
d. झालेला तोटा किंवा लावण्यात आलेला दंड बिलातून कपात करण्यात येईल.

### ११. कर कपात (Tax Deductions from Bills):

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त अमरावती

, आयकर / जीएसटी भरण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. तथापि, देयक करताना आयकर व जीएसटीचा टीडीएस कपात करण्यात येईल.

**१२. कराराची वैधता कालावधी (Period of Validity of Contract):**

दर करार कराराच्या दिनांकापासून एका वर्षासाठी वैध राहील. या कालावधीत निविदादाराने स्वीकारलेल्या दरांवर वाहतुक करणे बंधनकारक आहे. आवश्यकतेनुसार, परस्पर संमतीने ३ महिन्यांची मुदतवाढ समान अटींवर दिली जाऊ शकते.

**१३. देवकृपा / नैसर्गिक आपत्ती (Force Majeure):**

कराराच्या कालावधीत युद्ध, दंगल, पूर, आग, साथीचे रोग, संप, लॉक-आउट, दैवी आपत्ती इत्यादी कारणांमुळे कामात अडथळा निर्माण झाल्यास, अशा घटनेचे लेखी नोटीस २१ दिवसांच्या आत देऊन कोणत्याही पक्षाला करार रद्द करण्याचा किंवा नुकसानभरपाई मागण्याचा अधिकार राहणार नाही. परिस्थिती स्थिर झाल्यानंतर काम पुन्हा सुरू करण्यात येईल. तथापि, अशा परिस्थितीमुळे काम ३० दिवसांपेक्षा जास्त थांबले असल्यास, कोणताही पक्ष करार रद्द करू शकतो.

**१४. जोखीम खरेदी (Risk Purchase):**

पुरवठादाराने वेळेत वाहतुक न केल्यास किंवा करार नाकारल्यास, शासनास करार रद्द करून त्याच वस्तू इतर ठिकाणाहून खरेदी करण्याचा व त्याचा अतिरिक्त खर्च दोषी पुरवठादाराकडून वसूल करण्याचा अधिकार राहील. ही जोखीम खरेदी करार रद्द झाल्यानंतर ६ महिन्यांच्या आत केली जाऊ शकते.

**१५. वाद निवारण (Settlement of Disputes):**

a.मागणी संस्थांमध्ये व पुरवठादारामध्ये उद्भवलेल्या वादांचे निवारण अधोरेखित अधिकाऱ्याद्वारे केले जाईल. b. सर्व न्यायिक कार्यवाही **अमरावती** येथील न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रातच राहील.

**१६. अडचण निवारण (Removal of Difficulty):**निविदेतील तरतुदींमध्ये असलेल्या संदिग्धतेमुळे किंवा उद्दिष्टाशी विसंगत तरतुदींमुळे अडचण निर्माण झाल्यास, संबंधित अधिकारी त्याचे निराकरण करण्याचा निर्णय घेऊ शकतो. शासनाने घोषित केलेल्या सुट्ट्या किंवा इतर कारणांमुळे नमूद केलेल्या तारखांमध्ये बदल होऊ शकतो.

District Deputy Commissioner
of Animal Husbandry
Amravati

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
सत्यमेव जयते
अमरावती

# जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय अमरावती

## द्रवनत्र , गोठित रेत मात्रा व इतर अनुषंगीक साहित्य वाहतुकीसाठीचे नियम व अटी

1.निवीदा सुचनाचे अर्ज, नियम व अटी बाबत शुल्काची रक्कम रु. **4200/-** व निवीदेसोबत अनामत रक्कम रु. **55000/- ऑनलाईन भरणे** बंधनकारक आहे (शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र भाखस-2014/प्र.क्र.82/भाग-iii उद्योग-4 दिनांक 01.12.2016 अन्वये बंधनकारक राहील.)

2. स्वत:चं मालकीचे वाहन असणारेच निवीदा भरण्यास पात्र असतील.

3. वाहन सुस्थितीत असावे. वाहन 10 वर्षा पेक्षा जुने नसावे

4. नियम व अटी स्विकृत असल्याचे पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

5. निवीदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे संपुर्ण अधिकार जिल्हा स्तरीय निवीदा समितीस राहिल व त्यांचा निर्णय सर्वांना बंधनकारक राहिल.

### विभाग अ

1. निवीदा ई प्रणालीद्वारेच भरणे आवश्यक आहे.

2. तांत्रिक बीड मध्ये वाहन व व्यवसायासबंधी खालील कागदपत्राच्या छायांकित(**Xerox**) प्रती साक्षांकीत करुन ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. आणिी **मूळ प्रती** निवीदा उघडण्याच्या वेळी खात्री करण्यासाठी सोबत आणणे बंधनकारक आहे,

3. कंत्राटदार ज्या वाहनाने वाहतुक करणार आहे. ते वाहन त्याच्या स्वत:च्याच मालकीचे असावे. कोणत्याही तातडीचे प्रसंगी अमरावती मुख्यालयात संपर्क साधता येईल असा पत्रव्यवहाराचा व संपर्काचा पत्ता द्यावा.

4. तांत्रिक बीड मधील सर्व कागदपत्राची पुर्तता व पडताळणीअंती योग्य असणाऱ्या निवीदाकारांचीच व्यावसायीक बीड उघडण्यात येईल.

5. द्रवनत्राची रिकामी किंवा भरलेली पात्रांची वाहतुक ही अमरावती जिल्ह्याच्या अंतर्गत असलेल्या संपुर्ण कृत्रिम रेतन केंद्राना द्रवनत्र पुरवठा करण्याच्या दृष्टीने करावी लागेल, तसेच नागपुर किंवा महाराष्ट्र राज्याबाहेरील ज्यांच्याशी द्रवनत्र पुरवठ्याच्या भावबंद करार होईल त्या ठिकाणाहुन द्रवनत्र आणुन पुरवठा करावा लागेल.

6. जर काही कारणाने द्रवनत्र मिळाला नाही व तो संपुर्ण 7 दीवस मिळु शकत नसेल तर फक्त एकेरी वाहतुक भाडे मिळेल (जाण्याचे )जर दुसऱ्या दिवशी किंवा तिसऱ्या दिवशी मिळत असेल तर त्या दिवसाकरीता मुक्काम करावा लागेल. अशावेळी मुक्कामाचे भाडे देण्यात येणार नाही.

7. वाहतुकीचे वाहन नेहमी सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. तसेच सुस्थितीत नविन खरेदी केलेले असावे व निविदा उघडण्याच्या वेळी मुळ कागदपत्रासह तपासणी साठी वाहन उपलब्ध करुन द्यावे.

8. वाहतुकीच्या वाहनामध्ये किमान 20 एम.एम.कॉयर मॅटींग नरम आच्छादनांचा वापर करणे आवश्यक आहे. यामुळे द्रवनत्र पात्रांचे कोठैही नुकसान होणार नाही तसेच वाहनाच्या वरील बाजूने टाप झाकलेले असावे ज्यामुळे ऊन,वारा,पाऊस यापासुन संरक्षण मिळेल.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
सत्यमेव जयते
अमरावती

9. नागपुर किंवा जेथुन द्रवनत्राचा पुरवठा केला जाईल तेथुन 51.5लीटर क्षमतेचे 36 द्रवनत्र पात्रे भरुन आणण्याची व्यवस्था दरकराराच्या वाहनामध्येच करण्याची जबाबदारी वाहतुक ठेकेदाराची राहील. त्याकरिता वाहनामध्ये लाकडी फळ्या लावुन दुसरा मजला तयार करुन द्रवनत्र पात्रे सुरक्षीतपणे वाहतुक करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

10. द्रवनत्र पात्राची वाहतुक करतांना त्या वाहनामध्ये कार्यालयाचा एक प्रतिनीधी/ अधिकारी राहील. निवीदा धारकास कमीत कमी दोन व्यक्ती द्रवनत्र पात्रे चढ - उतार करण्याची व द्रवनत्र भरण्यासाठी दयावी लागतील. त्याकरीता कोणताही वेगळा आकार देण्यात येणार नाही.

निवीदा धारकाची स्वाक्षरी

## विभाग- ब

1. यशस्वी ठेकेदारास निवीदा मंजूर झाल्यापासुन निविदा मूल्याच्या कमीत कमी ३ टक्के अनामत रक्कम १५ दिवसाचे आत सुरक्षा ठेव (सिक्युरीटी डिपॉझीट)जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, अमरावती यांच्या नावाने भरावे लागेल. त्याच बरोबर कार्यकृतिची हमी पुर्ण करण्याबाबत रु. ५00/- च्या कोर्ट स्टँम्प पेपरवर लिहुन घ्यावी लागेल त्याशिवाय ठेका मंजुर केला जाणार नाही.

2. एकापेक्षा अधिक वाहने एकाच वेळी या कार्यालयाकरिता तसेच या कार्यालया अंतर्गत इतर संस्थेस वाहन लागल्यास मान्य केलेल्या दराने वाहन उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. अशा वेळी मुख्य ठेकेदार व्यतीरीक्त दुसऱ्याचे वाहन असु शकतील मात्र वाहतुकीची जबाबदारी ही मुख्य ठेकेदाराची राहील.

3. वाहतुकीच्या वेळी वाहनातील कि.मी. रीडींग सुरु असणे आवश्यक आहे. त्यानुसारच देयकाची रक्कम अदा करण्यास येईल.

4. संबधीत वाहनात इंधन,ऑईल ग्रीस इ. वाहतुक ठेकेदारास स्वखर्चाचे भरावे लागेल. व कोणत्याही करणाने इंधनाची दर वाढ मिळणार नाही .

5. वाहतुक करीत असताना शासकीय कामास्तव कंद्रावर किंवा कार्यालयास थांबवण्याच्या कालावधीकरिता कोणताही वेगळा आकार देण्यात येणार नाही. शासकीय प्रतिनीधीला कामाच्या स्वरुपानुसार केंद्रावर थांबता येईल तो पर्यंत वाहन तथे उभे करावे लागेल.

6. द्रवनत्र वायु हा अतिथंड असतो, त्यामुळे वातावरणाशी संबंध येताना त्यापासुन जी वाफ निघते, जीपण थंड असते. हा वायु स्फोटक नाही याची माहिती ठेकेदारांनी पूर्णपणे करुन घ्यावी.

7. वेळोवेळी शासकीय नियमातील काही बदलामुळे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, अमरावती यांनी केलेल्या सुचना व अटीचे पालन ठेकेदारांना करावे लागतील. निवीदाधारकांची कोणतीही अट मान्य करता येणार नाही, अन्यथा निविदा फेटाळल्या जातील, तसेच सर्व कार्यालयीन आर्थिक व्यवहार स्वत: ठेकेदारास करावे लागतील, प्रतिनीधी चालणार नाही.

निवीदा धारकाची स्वाक्षरी

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
सत्यमेव जयते
अमरावती

## विभाग – क

1. ठेकेदाराचा ठेका मंजुर झाल्यास परंतू नियमाप्रमाणे काम न केल्यास, दुसरा ठेका जादा दराने मंजुर करावा लागल्यास मूळ ठेकेदाराच्या सुरक्षा ठेव रकमेतून फरकाची रक्कम वसूल करण्यात येईल.
2. निवीदा भरतांनी धारकास नियम व अटी पूर्ण वाचून त्या समजावुन घेवुन त्यांना मान्य आहे असे समजून त्यावर स्वाक्षरी करावी लागेल.
3. संपुर्ण निवीदा स्विकारणे, मंजूर करणे अथवा नाकारणे इत्यादी बाबतीत सर्व संबंधीत अधिकार निविदा समितीस राहील, व समितीचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.
4. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, अमरावती यांना ठेकेदाराचे काम समाधानकारक न आढळल्यास ते बंद करण्याचे व तसेच दुसरे वाहन लावुन कार्यवाही करण्याचा अधिकार राहील. अशा वेळी सुरक्षा ठेव, अनामत रक्कम शासन जमा करण्यात येईल.
5. वाहनाचा वेग ताशी 40 कि.मी. पेक्षा जास्त नसावा, तसेच मद्यपान करुन चालक वाहन चालवीत असल्यास किंवा अनावश्यक वाहनाचा वेग मर्यादेचे उल्लंघन केल्यास,तसेच मद्यपानाच्या कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जावे लागेल, त्यामुळे संपत्तीचे नुकसान झाल्यास ठेकेदारास नूकसान भरपाई द्यावी लागेल.
6. निवीदा समितीसमोर स्वत: निवीदाधारकाने वेळीच आक्षेप घेतल्यास त्यावर विचार करण्यात येईल, परंतू निवीदा समितीसमोर कोणताही आक्षेप न घेता जर एखादे न्यायालयीन प्रकरण उदभवले तर निवीदा धारकावर संबंधित प्रकरणाची जबाबदारी राहील. ज्या निवीदा धारकास न्यायालयात जायचे आहे किंवा तक्रार करावयाची आहे त्यांनी अंतीम निर्णय होईपर्यंत त्यांचे सिक्युरीटी डिपॉझीट कार्यालयाचे ताब्यात राहील. सिक्युरीटी डिपॉझीट परत घेतल्यास निविदा धारकाची कोणतीही तक्रार नाही असे समजण्यात येईल.
7. जिल्हा अंतर्गत वाहतुक करतांना जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, अमरावती यांचे आदेशानुसार ठरवून दिलेल्या मार्गानेच वाहतूक करावी लागेल. यासंबधी उध्दवणारे वाद किंवा तक्रारीचे निराकरण करण्याचे अंतीम अधिकार कार्यालय प्रमुख यांना राहतील.
8. ज्या निवीदा धारकांचा क्रमांक दुसरा राहील त्याची अनामत रक्कम एक महिन्यानंतर परत करण्यात येईल. इतरांची अनामत रक्कम त्वरीत परत करण्यात येईल, क्रमांक एक ने ठेका नाकारल्यास त्याचा कॉल डिपॉझीट जप्त करण्यात येईल व दुसऱ्या क्रमांकांच्या निविदेस मान्यता देण्यात येईल्.
9. काही कारणास्तव पुढील नविन वर्षाचा ठेका पुढे ढकलला गेल्यास नविन ठेका होईपर्यंत जुन्याच दराने ठेकेदारास वाहतुकीचे काम करावे लागेल, तसेच ठेकेदाराने वाहतुकीचे देयक नियमितपणे सादर करावेत.
10. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, अमरावती यांनी ठरविलेल्या कार्यक्रमानुसार व मागणी प्रमाणे सर्व दृष्टीने सुस्थितीत असलेले वाहन उपलब्ध करुन न दिल्यास, संबधीत वाहतुकीकरिता बाहेरील दुसरे वाहन कोणतेही उपलब्ध दराने मिळवीण्यात येईल व त्याकरिता लागणारे जास्तीचे भाडे वाहतुक ठेकेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.
11. वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत सर्वसाधारण 12 तासापुर्वी सुचना देण्यात येईल. आकस्मिक परिस्थितीत वेळेवर वाहन बोलविण्यात येईल. पुर्व सुचना देवूनही वाहन वेळेवर उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करित आहेत. असे आढळुन आल्यास वाहनधारकास प्रत्येक वेळी कमीत कमी रु.00/- व जास्तीत जास्त रु.200/- दंड आकारण्यात येईल व तो दंड त्यांच्या देयकातुन वसुल केला जाईल्.
12. वाहतुक करीत असतांना कोणत्याही वाहन परीवहन नियमाविषयक नियमाचे किंवा पोलीस कायद्यानुसार नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदारावर राहील व वाहन जप्त किंवा इतर कार्यवाहीसाठी खोंळबून ठेवल्यास, वाहतुकीसाठी दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करुन त्यामध्ये द्रवनत्र पात्रांची वाहतुक करुन घ्यावे लागेल.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त अमरावती
सत्यमेव जयते

13. वाहतुक करित असतांना संबंधित वाहनात ठेकेदाराच्या अधिकृत प्रतिनिधी शिवाय कोणतेही प्रवासी किंवा प्रवासी- सामान घेवु नये, असे आढळल्यास कमीत कमी रू. 500/- व जास्तीत जास्त रु 2000/- दंड आकारण्यात येईल.

14. वाहतुकीचे वाहनामध्ये कॉयर मॅटीग नरम आच्छादनाचा वापर करणे आवश्यक आहे, तसेच वाहनास हुड आवश्यक आहे. ही व्यवस्था नसल्यास प्रत्येक फेरित निवीदा धारकास रु.2000/- दंड आकारण्यात येईल व हा दंड त्याच्या देयकातून वसुल करण्यात येईल.

15. कोणत्याही कारणास्तव वाहतुकीचा संप झाल्यास त्याकरिता या कार्यालयाच्या कार्यक्रमाच्या पत्रासह निविदाधारकाने पोलीस संरक्षण उपलब्ध करुन घेणे आणि द्रवनत्र वाहतुक सुरळीत करुन घेणे ही जबाबदारी ठेकेदाराची राहील. कारण या सेवा अत्यावश्यक आहेत.

16. प्रत्येक वाहतुकीच्या वेळी द्रवनत्र पात्रे वाहन चालकाच्या ताब्यात देण्यात येतील व ती व्यवस्थीत ठेवण्याची जबाबदारी वाहन चालकाची राहील. वाहतूकीच्या वेळी द्रवनत्र पात्रे हाताळतांना निष्काळजीपणा मूळे द्रवनत्र पात्राचे नुकसान झाल्यास त्याची किंमत वाहतुक ठेकेदाराकडुन वसुल करण्यात येईल.

17. प्रवासाच्या कालावधीत खाजगी नाक्यावरील टोल टॅक्स, ग्रामपंचायत, नगरपालीका रहदरी कर वाहतूक ठेकेदारास भरावे लागेल.

18. द्रवनत्र वाहतूक करारात जे वाहन करारबध्द झाले असेल तेच वाहन सुस्थितीत वाहतूकीकरीता वापरण्यात येईल, वाहनात त्रूटी दिसुन आल्यास वाहन परत करण्यात येईल. यास वाहनचालक जबाबदार राहील.

19. निवीदा मंजुर झालेल्या ठेकेधारकांच्या देयकातून नियमानुसार आयकर वसूल करण्यात येईल.

20. द्रवनत्र वाहतुकीचा करार दिनांक 1.11.2025 ते 31.10.2025 या कालावधी पुरताच राहील.

21. निवीदा www.mahatenders.gov.in व www.ahd.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक 27/10/2025 ते दिनांक 03/11/2025 रोजी ~~सांयकाळी~~ 12.00 वाजेपर्यत ई-निवीदा प्रणालीद्वारे भरण्याची मुदत ठेवण्यात आली असुन दिनांक 03/11/2025 रोजी दुपारी 15.00 वाजता ई निवीदा प्रणालीद्वारे उघण्यात येतील. त्यावेळी निवीदाधारक हजर राहु शकतील.

वरील सर्व अटी व नियम मी वाचल्या असून. त्या मला मान्य आहेत. असे लिहुन देत आहे.

**स्थळ:- अमरावती**

**दिनांक-**

निवीदा धारकाची स्वाक्षरी

निविदा धारकाचे पुर्ण नाव-

पत्ता-

साक्षीदारांचे नांव व स्वाक्षरी

1. ------------------------------
2. ------------------------------



## परिशिष्ट -D

### तपासणी यादी (Check List)

(फक्त निविदादाराने भरायची आहे)

खालील कागदपत्रे निविदा फॉर्मसोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. कोणतीही उणीव आढळल्यास निविदा अमान्य ठरविली जाईल. निविदा सील करण्यापूर्वी प्रत्येक बाब तपासा आणि योग्य ठिकाणी "होय" किंवा "नाही" म्हणून चिन्हांकित करा व संबंधित पृष्ठ क्रमांक नमूद करा.

## द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतुक निविदा

| क्र. | तपशील | जोडले आहे का | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | निविदादाराचे नाव व पत्ता - अनिवार्य | होय / नाही | |
| २ | आर्थिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ साठी आयकर विवरणपत्र प्राप्ती पावती - अनिवार्य | होय / नाही | |
| ३ | निविदादाराचा PAN नोंदणी प्रमाणपत्र - अनिवार्य | होय / नाही | |
| ४ | निविदादाराचा GST नोंदणी प्रमाणपत्र - अनिवार्य | होय / नाही | |
| ५ | निविदादाराने स्वाक्षरी केलेली घोषणा (परिशिष्ट - E) - अनिवार्य | होय / नाही | |
| ८ | निविदादाराने स्वाक्षरी केलेली तपासणी यादी (परिशिष्ट - D) - अनिवार्य | होय / नाही | |
| १० | EMD सवलतीसाठी संबंधित प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र / कागदपत्रे - अनिवार्य | होय / नाही | |
| ११ | वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र(Maharashtra State ) | होय / नाही | |
| १२ | रोड टॅक्स प्रमाणपत्र (Maharashtra State ) | होय / नाही | |
| १३ | वाहनाचा विमा अद्यावत असलेबाबत (Insurance Cover) | होय / नाही | |
| १४ | फिटनेस प्रमाणपत्र (Form ३८ ) | होय / नाही | |
| १५ | वाहतुक परवाना(Permit Transport Department Maharashtra) | होय / नाही | |
| १६ | निवीदा अर्जाचे शुल्क व अनामत रक्कम ऑनलाईन भरल्याबाबत पावती. | होय / नाही | |
| १७ | पी.यु.सी | होय / नाही | |
| १८ | कामाच्या अनुभवाचा तपशील. | होय / नाही | |

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त सत्यमेव जयते अमरावती

**निविदादाराचे नाव व स्वाक्षरी**

(मुद्रांक)

**परिशिष्ट - E**

**निविदादाराची घोषणा**

मी/आम्ही ________________________________________________

हे / हि ____________________________________ संस्थेचे संचालक / मालक असून,

मी / आम्ही निविदा फॉर्ममध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या आहेत आणि त्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास सहमत आहे / आहोत.

मी / आम्ही संस्थेबाबत सर्व बाबींशी पूर्णपणे परिचित असून निविदा फॉर्ममध्ये दिलेली माहिती माझ्या / आमच्या माहितीनुसार खरी व बरोबर आहे.

निविदा फॉर्ममध्ये चुकीची माहिती किंवा दिशाभूल करणारे तथ्य दिल्यास, माझ्या / आमच्या निविदेला अपात्र ठरविण्याव्यतिरिक्त, कायद्यानुसार मला / आम्हाला शिक्षा होऊ शकते.

मी / आम्ही मान्य करतो की, कोणत्याही वादाच्या प्रकरणात अधिकार क्षेत्र अमरावती शहराचे असेल.

मी / आम्ही द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतुकीच्या निविदेच्या सर्वसाधारण व विशिष्ट अटी काळजीपूर्वक वाचल्या असून, त्या अटी माझ्यासाठी / आमच्यासाठी मान्य आणि बंधनकारक असल्याचे मी / आम्ही गंभीरपणे घोषित करतो.

**ठिकाण:** ________

**दिनांक:** ________

**निविदादाराची स्वाक्षरी**

_______________

**(मुद्रांक)**

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त सत्यमेव जयते अमरावती